# वाशिम यशोगाथा

## ‘प्रधानमंत्री मुद्रा योजना’ च्या अर्थसहाय्याने उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार

नाव : विलास वाशीमकर

मोबाईल न. : ९८९०५५४६४७.

गाव : केकतउमरा, ता.जिल्हा- वाशिम

व्यवसाय : वाशिमकर अग्रो इरिगेशन, वाशिम

विलास वाशीमकर वाशिम तालुक्यातील अतिशय लहान खेड्यात राहणारे व्यक्तिमत्व, केकतउमरा हे त्यांचे मुळ गाव. वाशिम पासून काही अंतरावर असलेल्या ह्या छोट्या खेड्यातील व्यक्ती वाशिम सारख्या शहरात स्वतःचा व्यवसाय सुरु करू शकतो आणि त्याला प्रगतीपथावर सुद्धा नेऊ शकते हे सर्व फक्त आणि फक्त ‘मुद्रा’ योजनेंतर्गत मिळालेल्या अर्थसहायामुळे. गावामध्ये मिळेल ती मोलमजुरी करून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे विलास वाशिमकर. वाशिम मध्ये स्वयं रोजगार स्थापनेचे स्वप्न घेऊन प्रयत्नाला सुरुवात करतात. अनेक प्रयत्न करून सुद्धा अपेक्षित यश मिळत नसल्यामुळे अर्थसहायाकरिता प्रयत्न सुरु असतांना वाशिम येथील बँक ऑफ महाराष्ट्र चे व्यवस्थापक साहेबांना भेटून व्यवसाय संदर्भात संकल्पना सांगितली. बँक व्यवस्थापकांनी त्यांना मुद्रा अंतर्गत कर्ज उपलब्धतेबाबत माहिती दिली आणि विनाविलंब विलास यांना ५ लाख कर्ज मंजुरी दिली. आज वाशीमकर यांचे वाशीमकर अग्रो इरिगेशन म्हणून व्यवसाय वाशिम परिसरामध्ये प्रसिद्ध असून त्यांची एकूण गुंतवणूक ७ ते ८ लाख पर्यंत पोहोचली आहे. कर्जाची परत फेड नियमित सुरु असून मासिक ६० ते ७० हजार पर्यंत उत्पन्न मिळत आहे.

